ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.VI/Dec 2011pp.1-4

Research Paper

माध्यमिक शाळेतील कृतिसंशोधनाची सद्यस्थितीः पथदर्शी अभ्यास

सहा.प्रा.वाघमारे जितेंद्र हिरामण
सिंहगड कॉलेज ऑफ एज्युकेशन
(को.एड ;बी.एड.),नंदे पुणे -41.

प्रस्तावना

कृतिसंशोधनाच्या माध्यमातून आपल्या कामातील कृतिसंशोधन पध्दतीमधील कोणत्या बाबी ठेवायच्या कोणत्या वगळायच्या व कोणती नवीन भर घालायची याचा निर्णय शिक्षकाने स्वतः घेतला तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकेल व शिक्षकाची गुणवत्ता वाढ इष्ट दिशेने घडून येते. कृतिसंशोधनाच्या सैद्धांतीक व प्रात्यक्षिक कार्याचे योग्य प्रशिक्षण दिले असता माध्यमिक शिक्षणामध्ये व शिक्षकांच्या दृष्टीकोणात सकारात्मक बदल होऊशकेल. कृतिसंशोधनाच्या सैद्धांतीक व प्रात्यक्षिक कार्याचे योग्य प्रशिक्षण दिले असता माध्यमिक शिक्षणामध्ये व शिक्षकांच्या दृष्टीकोणात सकारात्मक बदल होऊशकेल.

आजच्या स्पर्धेच्या युगात मानवी जीवनामध्ये प्रचंड प्रमाणात परिवर्तन घडून येताना दिसून येते. हे परिवर्तन सामाजिक आर्थिक राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात घडत आहे. शैक्षणिक क्षेत्रातील परिवर्तनाचा जर विचार केला तर आजच्या काळात प्रत्येक विषयाच्या बाबतीत ज्ञानाचा प्रस्फोट होत आहे. ज्ञानाचा प्रस्फोट होण्यामागे असर्णाया विविध कारणांपैकी शिक्षणात होणारे संशोधन हे एक महत्वाचे कारण आहे. संशोधन हा शिक्षणक्षेत्राच्या विकासातील महत्वाचा घटक आहे म्हणूनच आपण पदव्युत्तर शिक्षणामध्ये संशोधनाला अधिक महत्व दिले आहे. किंबहुना संशोधनाशिवाय पदव्युत्तर शिक्षणाची कल्पनाच पूर्ण होत नाही. म्हणूनच प्रश्न हा उभा राहतो की पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अधिव्याख्याता व विद्यार्थी यांनाच संशोधनाची गरज आहे का ऋ प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्तीचा विकास होणे गरजेचे आहे किंवा नाहीऋ शिक्षणक्षेत्रात सर्व स्तरावर कार्य करणाया प्रत्येक व्यक्तीने संशोधन करावे ही अपेक्षा आहे. कारण त्या व्यक्तीचा व्यावसायिक विकास करण्यासाठी संशोधन करणे महत्वाचे ठरते.

अध्यापन व कृतिसंशोधन हे एकमेकांस पूरक आहेत. त्यामुळे होऊघातलेल्या शिक्षकांना त्यांच्या प्रशिक्षणात कृतिसंशोधनाचा फक्त तात्विक भाग घेऊन चालणार नाही तर प्रात्यक्षिक कार्यावर भर देणे आवश्यक आहे. यावर किमान आता तरी विचार होणे अपेक्षित आहे. कारण नवीन शालेय अभ्यासक्रमानुसार कृतिसंशोधनाला महत्व दिले आहे. शिक्षकांना जर कृतिसंशोधन योग्यरीत्या करावयाचे असेल तर त्यांना सेवापूर्व प्रशिक्षणापासूनच प्रात्यक्षिक कार्य करायला मिळाले पाहिजे तेव्हाच सेवांतर्गत कार्यशाळेत व नवीन अभ्यासक्रमास शिक्षक न्याय देऊशकतील अन्यथा कृतिसंशोधनाला परिपूर्णता अर्थपूर्णता व परिपक्वता येणार नाही असे वाटते.

संशोधनाची गरजः

खालील प्रमाणे संशोधनाची गरज आहे.

1. कृतिसंशोधनामुळे इतर शालेय समस्या स्वतःच्या प्रयत्नांनी स्थानिक स्वरूपावर शास्त्रीय पध्दतीने सोडविण्याची शिक्षकाची क्षमता अभ्यासता येते.

2. शिक्षकांमध्ये आपण स्वतःही प्रयत्न करून आपल्या समस्या सोडविण्याचा शास्त्रीय प्रयत्न करू शकतो असा विश्वास निर्माण करता येतो.

3. अन्य प्रकारच्या मुलभूत संशोधनाला आवश्यक असलेली पूर्व माहिती पुरविण्यास व स्थानिक क्षेत्रास त्यास मदत करण्यास प्रवृत्त करता येते.

4. शिक्षकांना संशोधन करण्यास प्रशिक्षण मिळेल.

5. शिक्षक आपल्या समस्या सोडविण्यासाठी स्वतः सतत कृतिशील राहतील.

6. या संशोधनाच्या समस्या शैक्षणिक क्षेत्रात काम करणाया व्यक्तीच्या प्रत्यक्ष कार्याशी संबधित असतात त्यामुळे समस्यांची निवड करणे सोपे होईल.

7. शिक्षकांना संशोधन पध्दतीची व संशोधन साधनांची ओळख होण्यास मदत होईल.

8. शालेय कार्यपध्दतीत सुधारणा होण्यास मदत होईल.

9. कृतिसंशोधनाच्या निष्कर्षांची अंमलबजावणी शिक्षक स्वतः करू शकतो व त्यामुळे समस्या सोडविण्याचा आत्मविश्वास त्याच्यामध्ये निर्माण होईल.

10. शिक्षकांची जिज्ञासापूर्ती होईल.

11. शालेय स्तरावरील छोटयामोठया समस्यांच्या निराकरणातून शिक्षकांचा दर्जा निश्चितच उंचावता येईल.

12. सहशालेय कार्यक्रमांचाही प्रभाव विद्यार्थ्यांच्या व्यक्तिविकासात मोठा असतो त्यामुळे त्यातील समस्यांचे निराकरणही महत्वाचे आहे त्या दृष्टीने शिक्षक प्रयत्न करेल.

13. जीवनाच्या अत्यंत संवेदनाशील अशा विकासाच्या टप्यातील हे शिक्षण आहे. त्यात उणिवा वा दोष राहू देणे योग्य नाही त्या दृष्टिने शिक्षक कृतिसंशोधन करेल.

14. सहज व साध्या उपायांनी अथवा उपक्रमांनी या समस्या सुटू शकतात व शैक्षणिक दैनंदिन कार्याचा दर्जा सांभाळणे शक्य होईल हे शिक्षकांना समजेल.

15. या स्तरावरील छोटयाछोटया समस्यासुध्दा उच्च शिक्षणात प्रचंड अडचणी उभ्या करू शकतात म्हणून त्यांना वेळीच आवर घालणे इष्ट होईल हे शिक्षकांना समजेल.

16. या समस्या शालेय शिक्षणाशी संबंधित अशा विद्यार्थी शिक्षक व पालक या सर्वच घटकांना असतुंष्ट ठेवतात व अस्वस्थ करतात प्रसंगी नैराश्यही निर्माण होते. त्यामुळे त्यांचे निराकरण करणे गरजेचे आहे हे शिक्षकांना समजेल.

17. शाळेतील दैनंदिन कार्याचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षक कृतिसंशोधन करेल.

18 . शैक्षणिक क्षेत्रात येर्णाया नवनव्या विचारांची परिणामकारकता आजमावण्यासाठी

शिक्षक कृतिसंशोधन करेल .

19 . शिक्षणातील परंपरावादी जुनाट कल्पनांचा त्याग व नव्या विचारांना वाट देण्यासाठी

शिक्षक कृतिसंशोधन करेल .

20 . शिक्षक मुख्याध्यापक व विद्यार्थी यांच्या शैक्षणिक कार्याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी कृतिसंशोधनाचा उपयोग होईल .

21 . विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासाचे विविध आणि परिणामकारक मार्ग शोधण्यासाठी व त्यांचे

उपयोजन करून ते पाहण्यासाठी कृतिसंशोधनाचा उपयोग होईल .

22 . शैक्षणिक क्षेत्रातील काम करर्णाया विविध घटकांचे परस्पर सहकार्य वाढविण्यासाठी कृतिसंशोधनाचा उपयोग होईल .

23 . समाजात नित्य घडर्णाया बदलांमुळे शैक्षणिक अभ्यासक्रम पाठयपुस्तके अध्ययर्नअध्यापन कार्य व मूल्यमापनाची प्रक्रिया यातही परिवर्तनाची गरज असते त्या दृष्टिने शिक्षक कृतिसंशोधन करेल .

संशोधनाचे उद्दिष्ट ः

माध्यमिक शाळेतील कृतिसंशोधनावावत सद्यस्थितीचा अभ्यास करणे .

संशोधनाची गृहीतके [Assumptions of Research] :

1 . शिक्षकांना कृतिसंशोधन करताना समस्या येतात .

2 . कृतिसंशोधनामुळे नवीन अभ्यासक्रमाच्या अध्ययन अध्यापनात व अंमलबजावणीत होणारे फायदे

याची शिक्षकांना जाणीव नाही .

3 . कृतिसंशोधनाच्या अंमलबजावणीने शैक्षणिक समस्या सुटण्यास मदत होते .

4 . नवीन अभ्यासक्रमामध्ये कृतिसंशोधन करणे आवश्यक आहे .

संशोधनाची पध्दती ः

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करून वर्तमान स्थितीचा अभ्यास केला आहे .

न्यादर्शन तंत्रः

प्रस्तुत संशोधनामध्ये पुणे जिल्हयातील माध्यमिक शाळेतील फक्त 50 शिक्षकांची निवड असंभाव्यतेवर आधारित पध्दती मधील सप्रयोजन न्यादर्श न पध्दतीने करण्यात आला होता .

संशोधनाची माहीती संकलनाची साधनेः

प्रस्तुत संशोधनामध्ये खालील माहीती संकलनाच्या साधनांचा वापर करण्यात आला होता .

1 प्रश्नावली

2 मुलाखत

संशोधनाची संख्याशास्त्रीय परिमाणेः

प्रस्तुत संशोधनामध्ये सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी दिल्या जाणा-या प्रश्नावलीचे विश्लेषण शेकडेवारी नुसार करण्यात आले .

संशोधनाचे निष्कर्षः

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आढळून आले .

1 . अध्यापन करताना अडचणी येतात काऋ

होय 86त नार्ही14 त

2 . शाळेत काम करताना कोणकोणत्या अडचर्णीना सामोरे जावे लागतेऋ

आंतरक्रिया32त मूल्यमापन48त शालेय प्रशासन36त सहशालेय कार्यक्रम22त .

3 . अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करता काऋ

होय 88त नार्ही12 त

4 . अडचणी सोडविण्यासाठी कोणत्या मार्गाचा वापर करताऋ

प्रत्यक्ष अनुभव68%, अधिकृत प्रमाण34%, कृती संशोधन24%,

1 . संशोधन म्हणजे कायऋ

योग्य28%, अयोग्य72%

2 . संशोधनाचे प्रकार कोणतेऋ

योग्य24%, अयोग्य76%

3 . कृती संशोधन म्हणजे कायऋ

योग्य18%, अयोग्य82%

4 . आपण शालेय स्तरावर कृती संशोधन केले आहे काऋ

होय 38%, नार्ही62 %

5 . कृती संशोधन करण्यासाठी मूख्याध्यापक शालेय व्यवस्थापन यांच्याकडून प्रेरणा मिळते का?

होय 52%, नार्ही48 %

6 . कृती संशोधनाचे प्रशिक्षण झाले आहे काऋ

होय 32%, नार्ही68 %

7 . कृती संशोधनाचे प्रशिक्षण कोणामार्फत झालेऋ

झेडपी 16त एससीइआरटी12 त तज्ज्ञमार्गदर्शन 12त

8 . सेवापूर्व व सेवांतर्गत संशोधन कार्य पूर्ण केले आहे काऋ

होय 10%, नार्ही90 %

9 . भविष्यात कृती संशोधनाची अधिक माहिती घेण्याची इच्छा आहे काऋ

होय 84%, नार्ही16 %

10 . समस्येची निवड कशी केली जातेऋ

योग्य12%, अयोग्य88%

11 . कृती संशोधन करण्यासाठी कोणत्या संशोधन पद्धतीचा वापर केला जातोऋ

योग्य8त अयोग्य92त

12 . कृती संशोधन नमूनानिवड

योग्य6%, अयोग्य94%

13 . कृती संशोधन आराखडा तयार करणे

योग्य2%, अयोग्य98%

14 . माहिती संकलनाची साधने

योग्य23%, अयोग्य77%

15 . संख्याशास्त्रीय तंत्र

योग्य17%, अयोग्य83%

माहितीचे अर्थनिवर्चन ः

प्रस्तूत संशोधनात माध्यमिक शाळेतील 50 शिक्षकांचा प्रतिसादक म्हणून समावेश करण्यात आला . पथदर्शी अभ्यास करण्याकरिता प्रश्नावलीमध्ये प्रश्नांची एकूण संख्या 30 होती . या प्रश्नांचे चार विभागामध्ये विभाजन करण्यात आले होते .

1 . पार्श्वभूमी

2 . अध्यापनातील समस्या

3 . कृती संशोधनाची पूर्व तयारी

4 . प्रत्यक्ष कृती संशोधनाची कार्यपद्धती

प्रतिसादकांनी दिलेला प्रतिसादाचे शेकडेवारीद्वारे अर्थनिवर्चन करण्यात आले .

निष्कर्ष ः

प्रस्तूत संशोधनामध्ये संशोधकास असे आढळून आले की अध्यापनादरम्यान शिक्षकांना विविध प्रकारच्या अडचणी येतात . त्या अडचर्णीचे निराकरण कसे करावे यासंबंधी त्यांना माहिती नसते . काही शिक्षक अडचणी सोडविण्यासाठी कृती संशोधनाचा उपयोग करतात परंतू परिपूर्ण प्रशिक्षण नसल्याने त्यांना या अडचर्णीचे निराकरण करता येत नाही . कृतिसंशोधनाचे प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांना देखिल सैद्धांतीक पार्श्वभूमी नसल्यामूळे कृती संशोधन परिणामकारकपणे पार पाडता येत नाही . पथदर्शी अभ्यासातून असे निदर्शनास आले की व्यवस्थापन, मुख्याध्यापक इ . शाळेतील घटक देखिल कृती संशोधनाबावत पुरेसे जागरूक नाहीत आपल्या शिक्षकांना ते प्रेरणा मार्गदर्शन देत नाहीत . संशोधनातून असे निदर्शनास आले की माध्यमिक शाळेतील शिक्षक कृतिसंशोधन करण्यास इच्छुक असतात परंतू कामाच्या व्यापामुळे त्यांना प्रशिक्षण पूर्ण करता येत नाही . कृतिसंशोधनाचे प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांच्या

प्रतिसादातून असे निदर्शनास येते की प्रशिक्षणात त्यांना तज्ज्ञ व्यक्तींचे पुरेसे मार्ग दर्शन मिळत नाही . प्रशिक्षणाचा कालावधी कमी असल्यामुळे कृतिसंशोधनाचे सखोल मार्गदर्शन मिळत नाही . अनुभवी शिक्षकांना सेवापूर्व प्रशिक्षणात संशोधनाची पार्श्वभूमी नसल्याने आणि नविन शिक्षकांना कमी प्रमाणात संशोधनाचे ज्ञान असल्याने कृतिसंशोधना संदर्भात जाणिवजागृती दिसत नाही महाराष्ट्र राज्य शासन परिपत्रकाप्रमाणे ह्यशासन निर्णय क.सुप्राअ ह्य2003ह्य12ऱ12003हप्रा.शि 5 दि 3ऱ8ऱ2004 अन्वये सन 200506 पासून शालेय स्तरावर प्रकल्पाची कार्यवाही अनिवार्य केली आहेह अनुसार माध्यमिक शाळेतील शिक्षकांना वढतीसाठी कृतिसंशोधन अनिवार्य करण्यात आले आहे.यामूळे माध्यमिक शाळेतील शिक्षक कृतिसंशोधना संदर्भात अधिक माहितीऱप्रशिक्षण घेण्यास इच्छुक असल्याचे निदर्शनास आले .

समारोपः

कृतिसंशोधनाच्या सैद्धांतीक व प्रात्यक्षिक कार्याचे योग्य प्रशिक्षण दिले असता माध्यमिक शिक्षणामध्ये व शिक्षकांच्या दृष्टीकोणात सकारात्मक वदल होऊशकेल .

दैनंदिन शालेय कामकाजात येणाया समस्या सोडविण्याचा प्रयत्न कमी अधिक प्रमाणात शिक्षक करीत असतो . या समस्यांच्या निराकरणार्थ माहीत असलेले दुसयांनी सांगितलेले मार्ग शिक्षक अवलंवितात . स्वतःचा या संदर्भात अभ्यास नसल्यामुळे ही महिती किंवा हेच मार्ग योग्य असावेत असा अंदाज बांधला जातो.हे मार्ग केवळ अंदाजावर आधारलेले असल्यामुळे बयाच वेळा अंदाज चुकण्याची शक्यता असते.अशी चुकीची उपाययोजना मूळ समस्येची सोडवणूक करू शकत नाही.यासाठी समस्या का उद्भवली याचा स्वतंत्रपणे स्वतः अभ्यास करणे आवश्यक असते.समस्या उद्भवण्यामागे विविध कारणे असतात.त्यापैकी काही कारणांचा विचारही मनाला शिवत नाही.त्याचप्रमाणे काही वेळेस महत्वाची कारणे बाजूला राहतात आणि इतरच कारणांना महत्व दिले जाऊन ती कारणे दूर करण्यासाठी उपाय योजले जातात.त्यामुळे कृतिसंशोधन पध्दतीचा उपयोग करून प्रत्येक समस्येचा चिकित्सक व शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास करून जर उपाययोजना केली तर ती परिणामकारक ठरू शकते व समस्येचे निराकरण होऊशकते .

कृतिसंशोधनाच्या माध्यमातून आपल्या कामातील कृतिसंशोधन पध्दतीमधील कोणत्या बाबी ठेवायच्या कोणत्या वगळायच्या व कोणती नवीन भर घालायची याचा निर्णय शिक्षकाने स्वतः घेतला तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होऊशकेल व शिक्षकाची गुणवत्ता वाढ इष्ट दिशेने घडून येते. कृतिसंशोधनाच्या सैद्धांतीक व प्रात्यक्षिक कार्याचे योग्य प्रशिक्षण दिले असता माध्यमिक शिक्षणामध्ये व शिक्षकांच्या दृष्टीकोणात सकारात्मक वदल होऊशकेल .